जा.क्र.मरापप / शिष्यवृत्ती /२०१४/८७३९
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे १.
दिनांक - ३०/१०/२०१४.

**प्रसिद्धीपत्रक**

# MSS/HSS (इ. ४थी, ७वी शिष्यवृत्ती) परीक्षा २०१५

१) **परीक्षेची तारीख -** रविवार दिनांक २२ मार्च २०१५.

२) **परीक्षेचे नाव -** अ) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा, शासकिय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदीवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा. (सर्व परीक्षा इ. ४थी साठी )
ब) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७वी साठी)

३) **परीक्षेचे माध्यम -** मराठी, उर्दू, हिंदी, गुजराथी, इंग्रजी, तेलुगु, सिंधी व कन्नड या आठ माध्यमातून घेतली जाते.
शिवाय सेमी इंग्रजी माध्यमही उपलब्ध.

४) **अभ्यासक्रम -**अ) पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा व विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) पुणे यांच्या इयत्ता १ ते ४ च्या अभ्यासक्रमावर घेतली जाते.
ब) माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT) पुणे यांच्या इयत्ता १ ते ७ च्या अभ्यासक्रमावर घेतली जाते.

५) **शिष्यवृत्तीसाठी पात्रता -** राज्यशासनाचा अभ्यासक्रम (MSCERT) राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थी गुणवत्तेनुसार शिष्यवृत्तीस पात्र ठरतात. CBSE/ICSE अभ्यासक्रमांच्या शाळांतील विद्यार्थी परीक्षेस बसू शकतात मात्र त्यांना शिष्यवृत्ती दिली जात नाही. (उर्वरित निकष संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

६) **परीक्षेचे स्वरुप -** MSS व HSS साठी प्रत्येकी तीन प्रश्नपत्रिका असतात. सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ (बहुपर्यायी) असतात.

७) **शिष्यवृत्ती संच -** इयत्ता ४थी करीता विविध प्रकारचे १६,६८३ आणि इयत्ता ७वी साठी १६,५७८ शिष्यवृत्ती संच मंजूर आहेत. एखादा विद्यार्थी पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्तीसाठी व विद्यानिकेतन प्रवेशासाठी गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास दोहोंचा लाभ दिला जातो.

८) **शुल्क -**
अ) ऑनलाईन आवेदनपत्र नोंदणी शुल्क रु. १०/- (सर्व विद्यार्थ्यांसाठी)
ब) परीक्षा शुल्क रु. ५०/- (महाराष्ट्र शासनाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळेतील मागासवर्गीय - SC, ST, VJNT या प्रवर्गांना परीक्षा शुल्क नाही)
क) शाळा संलग्नता शुल्क रु. २००/- (४थी, ७वी शिष्यवृत्ती, NTS व NMMS परीक्षेसाठी मिळून)

९) **आवेदनपत्र भरण्याची पद्धत -** केवळ ऑनलाईन पद्धतीनेच आवेदनपत्र शाळेमार्फत भरावयाचे आहे.

१०) **संकेतस्थळ - www.mscepune.in**
(Path :- Home Page → 4th & 7th Scholarship Exam Application Registration Info. →School Login)

- शाळेने Login करण्यापूर्वी सर्व सूचना वाचणे, शाळा माहिती प्रपत्र (School Profile) व आवेदनपत्राचे नमुने पाहणे आणि नमुन्यांची प्रिंट घेऊन शाळा माहिती प्रपत्र (School Profile) व आवेदनपत्रे भरण्याचा सराव करणे आवश्यक आहे.

११) **संपर्क माहिती - मदत कक्ष (**मोबाईल क्रमांक) कार्यालयीन वेळेत -
आवेदनपत्र भरण्याबाबत : **७७७४०१२४५५, ७७७४०१२४५६** आणि **७७७४०१२४५७**
School Information Gateway (SIG) च्या मदतीसाठी :- **७७७४०१२४५८**.
ईमेल आयडी : mscepune@gmail.com आणि msshss.msce@gamil.com

# आवेदनपत्र भरण्याबाबतच्या ठळक बाबी

- परिषदेकडून Login Id व Password मिळाल्यानंतर शाळेने सर्वप्रथम शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरणे आवश्यक आहे.
- Login ID व Password मिळाला नसल्यास संकेतस्थळावरील विहीत नमुन्याप्रमाणे मुख्याध्यापकांनी अर्ज ईमेल द्वारे परिषदेकडे पाठविणे आवश्यक आहे.
- शाळा माहिती प्रपत्र (School Profile) भरुन confirm केल्यानंतरच विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरता येणार आहेत.
- ऑनलाईन चलनाची प्रिंट घेऊन बँकेत शुल्क भरल्यानंतर शाळेने चलन अपडेट करणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र प्रिंट करण्याची आवश्यकता नाही. परीक्षेची आवेदनपत्रे भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी (प्रपत्र अ), असल्यास प्रमाणपत्रे (पालकाचे उत्पन्न २०,०००/- पेक्षा कमी असल्याचे प्रमाणपत्र, पालक भूमिहिन शेतमजूर असल्याचे प्रमाणपत्र) व शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखांमार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफिसर यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे.
- आवेदनपत्रासाठी विद्यार्थ्यांच्या फोटोची आवश्यकता नाही. मात्र जानेवारी महिन्यात प्रवेशपत्रावर (Hall Ticket) लावण्यासाठी Identy Size फोटो तयार ठेवणे आवश्यक आहे.
- पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा व विद्यानिकेतन (शासकीय, आदिवासी, विमुक्त जाती व भटक्या जमाती) प्रवेश परीक्षा यासाठी एकच आवेदनपत्र आहे. त्यात विद्यानिकेतन प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांना विकल्प देण्यात आला आहे.
- सविस्तर माहिती व सूचनांसाठी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबतचे वेळापत्रक

| | अ. क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|---|
| नियमित शुल्कासह (With Regular | १) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ४ डिसेंबर २०१४ |
| | २) | चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ |
| | ३) | चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ८ डिसेंबर २०१४ |
| | ४) | 'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | १ नोव्हेंबर २०१४ ते ९ डिसेंबर २०१४ |
| विलंब शुल्कासह (With Late fees) | ५) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते १९ डिसेंबर २०१४ |
| | ६) | चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २० डिसेंबर २०१४ |
| | ७) | चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २२ डिसेंबर २०१४ |
| | ८) | 'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | ५ डिसेंबर २०१४ ते २३ डिसेंबर २०१४ |
| अतिविलंब शुल्कासह (With Super Late | ९) | इ. ४थी/७वी शिष्यवृत्ती परीक्षा, विद्यानिकेतन प्रवेश परीक्षेची आवेदनपत्रे भरणे. ऑनलाईन चलनाची प्रिंट घेणे.<br>चलनाद्वारे बँकेत शुल्क भरणे.<br>चलन अपडेट (update) करणे व 'प्रपत्र अ' ची प्रिंट घेणे.<br>'प्रपत्र अ' सोबत आवश्यक प्रमाणपत्रे, शुल्क भरल्याच्या चलनाची प्रत (MSCE copy) केंद्रप्रमुखामार्फत गटशिक्षणाधिकारी/वॉर्ड ऑफीसर यांचेकडे जमा करुन पोहोच घेणे. | २० डिसेंबर २०१४<br>ते<br>परीक्षेपूर्वी १५ दिवस अगोदर पर्यंत. |

- हे प्रसिद्धीपत्रक परिषदेच्या संकेतस्थळावर Home Page वरील News & Updates मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
- इच्छुक विद्यार्थी/पालकांनी शाळेशी संपर्क साधावा, असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे - १ कळवितात.

**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - १.**